प्रति, दिनांकः

मा. श्री./श्रीमती.........................................
विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
महाराष्ट्र राज्य................
यांस सप्रेम नमस्कार

*विषयः— अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती लाभाचा प्रश्न विधानसभेत मांडणेबाबत*
*९ डिसेंबर रोजी येणाऱ्या नागपूर मोर्चात मार्गदर्शन करणेबाबत*

महोदय/महोदया,

आमच्या विधानसभा क्षेत्राचे लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही आपणास विनंती करीत आहोत की आम्हा अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती लाभाचा प्रश्न आपण विधानसभेच्या येत्या डिसेंबर २०१३ च्या हिवाळी अधिवेशनात मांडावा व त्याच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करावेत. या प्रश्नाची थोडक्यात पार्श्वभूमी अशी आहेः

सन १९७५ पासून सुरु झालेल्या आयसीडीएस या प्रकल्पांतर्गत गर्भवती महिला, स्तनदा माता व ६ वर्षा खालील मुलांचे संगोपन या महत्त्वाच्या कामासाठी अंगणवाडीची संकल्पना अंमलात आणली गेली. या कामाचे फायदे दिसू लागल्याने सुप्रीम कोर्टाने अंगणवाडया सार्वत्रिक कराव्यात, अशी शिफारस २००९ साली केली. आज महाराष्ट्रात **१०७३२०** अंगणवाडया असून त्यात **९७४६२** सेविका व **९७४६२** मदतनिस, तसेच **९८८०** मिनीअंगणवाडी सेविका कार्यरत आहेत.

परंतू या कर्मचाऱ्यांना राज्य सरकार "स्वयंसेवक" असे संबोधित आले आहे. म्हणजे त्यांना राज्य सरकारी कर्मचारी समजले जात नाही. त्यामुळे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या कित्येक सोयी—सवलतींपासून त्यांना वंचित राहावे लागत आहे. राज्य सरकारची विविध खाती अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर योजनेव्यतिरिक्त अनेक कामे लादतात त्यामुळे प्राथमिक आरोग्य व बालसंगोपनाच्या कामाकडे दुर्लक्ष होते. तरी योजनेव्यतिरिक्त खातेबाहय काम देऊ नये.

आज ३८ वर्षानंतर त्यांचे मानधन अनुक्रमे ४०००/— (सेविका) व २०००/— (मदतनिस) असे मिळते आहे. एवढया कमी मानधनावर काम केल्यावर निवृत्तीनंतर त्यांना काही आधार राहात नाही. म्हणून एकरकमी निवृत्ती लाभाची मागणी समोर आली. अर्जविनंत्या करुन उपयोग होत नाही हे दिसल्यावर आम्हाला नाईलाजाने आंदोलनावर भर द्यावा लागला. आज अंगणवाडी क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व संघटना एकत्र येऊन ही एकमुखी मागणी करीत आहोत.

राज्य सरकारला या प्रश्नांची जाण आलेली आहे. त्यामुळे ५ एप्रिल २००५ मध्ये निवृत्तीवेतनाचा शासन निर्णयही झाला. पण तों अंमलात आणला गेला नाही. त्यामुळे पुढे राज्य शासनाने २१ ऑगस्ट २००८ रोजी सुधारित शासन निर्णय केला. परंतू त्याचीही अंमलबजावणी झाली नाही. शासनाने आपल्या शासन आदेशाची अंमलबजावणी करावी याबाबत शासनाकडे अंगणवाडी कर्मचारी कृती समितीसोबत अनेक बैठका झाल्या. त्यात या कर्मचाऱ्यांना एकरकमी सेवानिवृत्ती लाभ देण्याचे ठरले तसा प्रस्तावही वित्त विभागाकडे पाठविण्यात आला. परंतू निर्णय अजूनही झालेला नाही. यामुळे निवृत्त होत चाललेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांची स्थिती या महागाईच्या काळात दयनीय झालेली आहे.

जवळच्या गोवा राज्यात सेवानिवृत्ती झाल्यानंतर सेविकेला ३ लाख/– तर मदतनिसांना १ लाख ५० हजार/– दिले जातात. त्यांचे मानधन अनुक्रमे १५०००/– व ७५००/– तसेच पाँडिचेरी व तामिलनाडू या राज्यांत सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. इतरही राज्यांत महाराष्ट्रापेक्षा अधिक मानधन दिले जात आहे. मात्र महाराष्ट्र सरकारने समाजाच्या उगवत्या विभागाची काळजी घेण्याचे काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडलेले आहे.

तरी अंगणवाडी महिलांच्या या मागण्या विधानसभेच्या येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात लावून धरणे अत्यंत गरजेचे आहे. आपण ते कराल अशी आमची रास्त अपेक्षा आहे. याच काळात आम्ही दिनांक ९ डिसेंबर रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनावर राज्यव्यापी मोर्चा घेऊन जाण्याचे ठरविले आहे. त्या सुमारास आपणही हा प्रश्न विधानसभेत मांडावा तसेच मोर्चात सहभागी झालेल्या महिलांना मार्गदर्शन कराल अशी अपेक्षा आहे.

विनित

कॉ. सुकुमार दामले        ॲड. माधुरी क्षिरसागर        कॉ. दिलीप उटाणे

# महाराष्ट्र राज्य अंगणवाडी-बालवाडी कर्मचारी युनियन (आयटक)

१७, दळवी बिल्डिंग, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई-४०० ०१२, २४३७४९३०

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :** महाराष्ट्र राज्य कौन्सिल (आयटक), भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

---

अध्यक्ष : **कॉ. सुकुमार दामले** कार्याध्यक्ष : **कॉ. दिलिप उटाणे** कार्यवाह : **कॉ. माधुरी क्षिरसागर**


जा. क्र ११/आयटक/२०१३ दिनांक १३ नोव्हेंबर २०१३

प्रति,

मा. मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई.

मा. उपमुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई.

मा. मंत्री,
महिला व बालविकास विभाग
मंत्रालय मुंबई.

मा. राज्य मंत्री
महिला व बालविकास विभाग
मंत्रालय मुंबई.

मा. मुख्य सचिव
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई.

**विषयः–अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या करिता नागपूर हिवाळी अधिवेशनावर ९ डिसेंबर २०१३ रोजी पायी व मुक्कामी मोर्चाची पूर्वसुचना**

महोदय/महोदया,

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकरिता महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृ तीसमिती च्या वतीने 22 ऑक्टोबर रोजी आझाद मैदान मुंबई येथे मोर्चा काढण्यात आला होता. प्रलंबित मागण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांच्याशी 23 ऑक्टोबर रोजी चर्चा झाली. त्यात मा. मुख्यमंत्री महोदय यांनी विशेषकरुन भाऊबीज भेट 2000/– तर सेवा समाप्तीनंतर एकरकमी लाभ देण्याबाबत आठ दिवसांत निर्णय होईल तसेच इतर मागण्यांबाबत लवकरच निर्णय घेतले जातील असे आश्वासन दिले होते. परंतू दिवाळी संपली तरी अजूनही गोड झाले नाही. तसेच प्रलंबित मागण्यांबाबत शासनाची उदासिनता दिसून येत असल्यामुळे नाईलाजाने वरील संघटनेस विधानसभेच्या येणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच 9 डिसेंबर 2013 रोजी मोर्चा घेऊन येण्याचा निर्णय घ्यावा लागत आहे. अंगणवाडी कर्मचारी गडचिरोली येथून भंडारामार्गे, यवतमाळ, वर्धा व अमरावती येथून तसेच नागपूर जिल्हयातील विविध ठिकाणांहून पायी मोर्चानी नागपूरात दाखल होतील. तसेच मागण्या मान्य न झाल्यास त्याच ठिकाणी मागण्या मान्य होईपर्यंम मुक्काम करतील.

दि. 6 डिसेंबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनापासून पायी मोर्चाला सुरुवात होईल. दरम्यान अनुचित प्रकार घडल्यास सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील. आंदोलनकाळात अंगणवाडी केंद्र पूर्णतः बंद असल्याने आहार बंद राहील. तरी खालील मागण्यावर तात्काळ निर्णय व्हावा. निर्णय झाल्यास मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विभागाचे मंत्री, राज्यमंत्री यांचा भव्य सत्कार करण्यात येईल.

मागण्याः

1. सेवासमाप्तीनंतर एकरकमी लाभः अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवासमाप्तीनंतर द्यावयाच्या एकरकमी लाभाची मागणी बराच काळ शासनापुढे अनिर्णित अवस्थेत आहे. महाराष्ट्र शासनाने 2005 व 2008 साली अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पेन्शन देण्यासंबंधी शासकीय निर्णय घेतले होंते. परंतू त्याची अंमलबजावणी महाराष्ट्र शासनाने केली नाही.

शासनाची याबाबतची भूमिका अनास्थेची व सहानुभूतीशून्य आहे. यामुळे सेविका/मदतनिसांमध्ये अत्यंत प्रक्षोभाची व संतापाची भावना आहे. शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सातवा वेतन आयोग नेमला परंतू अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनवाढीबाबत व इतर मागण्यांबाबत काही विचार होत नाही. सेवासमाप्तीनंतर द्यावयाच्या लाभासंबंधीचा प्रश्न गेली नऊ वर्षे भिजत व रेंगाळत पडला आहे. आश्वासने दिली जातात व निर्णय मात्र घेतले जात नाहीत. अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी–बालवाडी कर्मचारी युनियन (आयटक) च्या वतीने 9 डिसेंबर 2013 रोजी पायी व मुक्कामी मोर्चा करण्याचा निर्णय घेतला आहे.

तरी वरील प्रलंबित प्रश्नांबाबत वरील संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे प्रश्न समाधानकारकरित्या सोडवावेत ही विनंती.

आपला नम्र

(कॉ. दिलीप उटाणे)
कार्याध्यक्ष

प्रति माहिती व कार्यवाहीसाठीः

1. मा. प्रधानसचिव महिला व बालविकास विभाग, मंत्रालय मुंबई 32
2. मा. आयुक्त महिला व बालविकास विभाग, राणीचा बाग, पुणे 1
3. मा. उपायुक्त, महिला व बालविकास विभाग (अंगणवाडी प्रशासन), राणीचा बाग, पुणे 1
4. मा. पोलिस आयुक्त नागपूर विभाग नागपूर
5. मा. जिल्हाधिकारी (सर्व)....................
6. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. (सर्व)..................

7. मा. जिल्हा पोलिस अधिक्षक (सर्व) ....................